विशेष दिवाणी दावा क्र.१८/२०२३
स्वरा वि. रामराव
वादी तर्फे सा.क्र.२ **(नि.क्र.५७)**



**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.एस.एस.कांबळे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

हे खरे नाही की, स्वराचा जन्म झाल्यानंतर अंजली दुस-यांदा गरोदर होती. हे खरे नाही की, तिला हडोळती येथील सरकारी रुग्णालयात तपासल होते. हे खरे नाही की, कंधार येथील डॉ. फाजगे यांचेकडे तिचा गर्भपात करण्यात आला. हे खरे नाही की, डॉक्टरांकडे गर्भपाताचे फॉर्मवर वादी २ चा पती म्हणून माझ्या मेव्हूण्याने सही केली. अंजलीचा नर्सींग कोर्स झालेला आहे.

अंजली कोठेही काम करीत नाही. हे खरे की मी सेवानिवृत्त आहे. कंधार येथे वादी सात ते आठ महिने राहीली. हे खरे की, २०१० ते २०१२ या काळात प्रतिवादी बोथी ता चाकूर येथील आश्रम शाळेत शिक्षक म्हणून होती. हे खरे की, तिथे पगार मिळेना म्हणून तिने नोकरी सोडली. हे खरे की, ७ एप्रिल २०१४ रोजी प्रतिवादी १ हा राचन्नावाडी येथे शाळेवर रुजू झाला. हे खरे नाही की, २०१४ ते २०२० या काळात प्र वा १ ला पगारच मिळत नव्हता. मी त्याचा पगार दाखला बघीतला का या प्रश्नाला साक्षीदार उत्तर देत नाही. प्रतिवादी १ याने शाळा पगार देत नाही म्हणून न्यायालयीन लढाई लढली होती हे मला माहित आहे. पगार देईनात म्हणून शाळेविरुध्द त्यांची तक्रार होती, हे खरे आहे. हे खरे नाही की, २०२० सालापर्यंत त्यांना काहीच कमाई नव्हती. मला दावा मिळकतींचे कमांक माहिती आहेत. या सर्व दावा मिळकती सन २०२० सालापूर्वी रामराव वगळता इतर प्रतिवादींनी खरेदी घेतलेली आहेत, हे खरे नाही. प्रतिवादी क्र ४ हा विज वितरण कंपनीत मिटर रिडर म्हणून ढोरसांगवी येथे कार्यरत होता, हे खरे नाही. दावा मिळकती कोणाच्या नावावरुन कोणाकडे कशा आला याचे फेरफार उतारे मी पाहिलेले आहेत. ५३८ हा फेर क्रमांक मला सांगता येत नाही. प्रतिवादी १ व ४ चे रेशनकार्ड २०१३ पासून वेगवेगळे आहे, हे खरे नाही. दव्यातील सर्व मिळकती या स्वकष्टार्जीत आहेत, हे खरे नाही. गट क्रमांक २९७,

२३६ च्या चतूसिमा मला सांगता येतात.  शिरुर ता. येथील मिळकत कोणी विकली व कोणी खरेदी घेतली याबददल मबला नांवे सांगता येणार नाहीत.  हे खरे नाही की, वादीला मदत व्हावी म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.  हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक १३/०३/२०२६.    दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.